**शासकीय अध्यापक महविद्यालय, पनवेल**

**बी. एड . वर्ष २०२३-२०२४ द्वितीय वर्ष सत्र ३**

**आंतरवासिता शाळेचे नाव: को . ए. सो. के. वी. कन्या विद्यालय, पनवेल**

**आंतरवासिता कालावधी : २३ऑक्टोंबर २०२३ ते २० जानेवारी २०२४**

**गट अहवाल**

मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार बी.एड. द्वितीय वर्ष, तृतीय सत्रातील आंतरवासितेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पाच गट तयार करण्यात आले. त्यानुसार गट क्रमांक दोन आंतरवासितेसाठी के. वी. कन्या विद्यालय पनवेल ही शाळा देण्यात आली. आंतरवासितेसाठी शाळेची पूर्वपरवानगी घेण्यात आली. आंतरवासितेच्या उपक्रमासाठी कृती उद्बोधन सत्र घेण्यात आले. त्यामध्ये आंतरवासितेचे नियोजन करण्यात आले. शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन शाळेसंबंधित माहिती ,शाळेचे नाव ,मुख्याध्यापकांचे नाव , शाळेची वेळ, शिक्षकांचे वेळापत्रक ,विद्यार्थ्यांचे वेळापत्रक इत्यादींची माहिती घेण्यात आली.

एकूण अकरा आठवड्याच्या कालावधीत पुढील उपक्रम पूर्ण करण्यात आले. नियोजन करताना प्रत्येक आठवड्याचे साप्ताहिक ,नियोजनाचे पूर्व नियोजन ,साप्ताहिक नियोजन कार्यवाही अहवाल तयार करण्यात आले. सर्वांनी आपले व्यक्तिगत साप्ताहिक पूर्व नियोजन, कार्यवाही व अहवाल तयार केले.

**११ आठवड्यांत एकूण केलेले उपक्रम पुढील प्रमाणे:-**

**सराव पाठ** :- प्रत्येक विद्यार्थ्याला एकूण दहा सराव पाठ घेणे अपेक्षित होते. शालेय शिक्षकांना भेटून त्यांच्यासोबत चर्चा करून सरावपाठांसाठी पाठ्य घटक घेण्यात आले. घटक घेताना घटक संकल्पना स्पष्ट होईल अशा पद्धतीने घटक घेण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्यांनी ने पाठ नियोजन तयार करून मार्गदर्शक प्राध्यापकांकडून त्यांचे मार्गदर्शन घेतले. २७ ऑक्टोंबर २०२३ ते ११ डिसेंबर २०२३या कालावधीत आपले दहा सराव पाठ पुर्ण केले .

**आशयाधिष्ठित पाठ (Theme Base) :-**

आशयाधारित पाठांचे नियोजन कसे करावे या संबंधित उद्बोधन करण्यात आले. विषय कसे निवडावे, आशय कसा असावा , आशयाशी संबधित माहिती संकलित कशी करावी या संबंधित मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली ४ जानेवारी २०२४ ते ६ जानेवारी २०२४ पाठ पूर्ण करण्यात आले. आशयाधारित पाठ निवडण्यासाठी प्रत्येकाला "पर्यावरण व महिला "समस्या यावर १० उपविषयांची विषयांची निवडण्यास सांगितली" तयार करण्यात आलेल्या विषयावर गटचर्चा करण्यात आली. चर्चा करून यादीतील दोन विषय निश्चित करण्यात आले. दोन्ही विषयांवर पाठ टाचण तयार केले तयार केलेले पाठ टाचण मार्गदर्शकांकडून तपासून घेतले. आशयाधिष्ठित पाठ घेताना स्वतः मार्गदर्शक तिथे उपस्थित राहून त्यांनी पाठांचे निरीक्षण केले. अशा पद्धतीने सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी आपले दोन पाठ पूर्ण केले.

.

Edit with WPS Office

| छात्रध्यापकांची नावे | मुख्य विषय → हजेरी क्रमांक | पर्यावरण समस्या | महिला समस्या |
|---|---|---|---|
| छाया भोये | 04 | सांडपाणी व्यवस्थापन | थोडं आपल्या हक्कासाठी थोडं आपल्या संरक्षणासाठी |
| प्रियंका भोये | 05 | हरित क्रांती | मुलींबद्दल कुटुंबाचा किंवा समाजाचा दृष्टिकोण |
| मीनाक्षी चव्हाण | 07 | प्लास्टिक घटवा व पर्यावरण वाचवा | मालमत्तेच्या अधिकार |
| ज्योती डोंबरे | 10 | झाडे लावा झाडे जगवा | हुंडाबळी |
| ऋतुजा मोकाशी | 26 | घनकचरा व्यवस्थापन | मुलींच्या आरोग्यविषयक समस्या |
| प्रेमा पडवले | 28 | सेंद्रिय शेती | महाराष्ट्रातील स्त्रियांची बदलती स्थिती |
| समंता रणपिसे | 35 | ई- कचरा व्यवस्थापन | स्त्री भ्रूण हत्या |
| तृप्ती राऊत | 37 | मृदा | ग्रामीण महिलांच्या मूलभूत समस्या आणि उपाय |
| कविता शर्मा | 41 | जंगल तोड | महिला सुरक्षा |

**शालेय शिक्षकांसमवेत अध्यापन (Co- Teaching):-**

शालेय शिक्षकांसोबत संपर्क साधून प्रशिक्षणार्थ्यांनी शालेय शिक्षकांच्या समवेत पाठ घेण्यासाठीचे पाठ्यघटक मिळवले. त्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी पाठ टाचण तयार करून तपासून घेतले. २९डिसेंबर २०२३ ते ४ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये सह अध्यापन पाठ घेण्यात आले .अशा प्रकारे प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यानी १० सराव पाठ ,२ विषय आधारित पाठ , ३ शालेय शिक्षक सह -अध्यापन पाठ असे एकूण १५ पाठ पूर्ण केले.

**घटक चाचणी निर्मिती आयोजन व संख्याशास्त्रीय विश्लेषण :-**

प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांनी विशिष्ट वर्गावर विशिष्ट घटकाचे अध्यापन करून त्या घटकावर आधारित घटक चाचणी तयार केली. घटक चाचणी तयार करताना पाठ्य घटकांनुसार गुण विभागणी तक्ता , प्रश्न प्रकारानुसार गुण विभागणी तक्ता ,उद्दिष्टानुसार गुण विभागणी तक्ता, काठीण्य पातळीनुसार गुण विभागणी तक्ता आणि संविधान तक्ता तयार करून त्यानुसार घटक चाचणीची निर्मिती केली. तयार करण्यात आलेली घटक चाचणी प्रश्नपत्रिका आणि गुणदान तक्ता, उत्तर सूची मार्गदर्शक प्राध्यापकांकडून चर्चा करून मान्य करून घेण्यात आली .आणि त्यानंतर ८जानेवारी २०२४ ला घटक चाचणी घेण्यात आली. घेण्यात आलेल्या घटक चाचणीतील प्राप्तांक गुणांवर संख्याशास्त्रीय प्रक्रिया ,गुणांचे संख्याशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले .प्रत्येक विद्यार्थ्यांनी ने प्राप्तांक गुणांवर संख्याशास्त्रीय प्रक्रिया करून मध्यमान, मध्य , बहुलक आलेख शततमक वक्र इत्यादींचा साह्याने संख्याशास्त्रीय विश्लेषण पूर्ण केले. घटक चाचणी निर्मिती कार्यवाही व संख्याशास्त्रीय विश्लेषण याविषयीचा अहवाल प्रत्येक विद्यार्थ्यांनी ने सादर केला गटातील विद्यार्थ्यांनीचे गट मार्गदर्शन प्राध्यापक यांनी त्यांचे मूल्यांकन

Edit with WPS Office

केले.

**चित्रकला स्पर्धा :-**

दिनांक ७ डिसेंबर २०२३ रोजी चित्रकला स्पर्धा झाली.  त्या ठिकाणी त्यांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्याकडून ग्रीटिंग कार्ड बनवून घेतले  आणि त्यां मधून प्रथम क्रमांक निवडण्यात आला.

**संस्थेचा वर्धापन दिन :-**

१८ डिसेंबर या दिवशी शाळेच्या शाळेचा वर्धापन  दिन साजरा करण्यात आला. त्यामध्ये सर्व अध्यापकांनी  मुलांना रांगेत लावण्याचे काम केले, तसेच या दिवशी विविध फनी  गेम घेण्यात आले. गाढवाला शेपूट लावणे ,लिंबू चमचा, कपाळाला टिकली लावने , पोते घालून उडी मारणे इत्यादी फनी गेम घेण्यात आले. त्यामध्ये सगळ्या छात्राध्यापिकांचा समावेश होता.

**क्रीडा स्पर्धा  :-**

दिनांक १२ डिसेंबर २०२३ ते १६ डिसेंबर  या कालावधीत को. ए. सो. के. वी. कन्या विद्यालय पनवेल येथे शालेय स्तरावरील क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आले  होते. शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती वावेकर मॅडम यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले . त्यावेळी शाळेच्या क्रीडा  शिक्षिका शाळेतील सर्व शिक्षक व गट क्रमांक २ सर्व छात्राध्यापिका उपस्थित होते .या क्रीडा स्पर्धेत खेळामध्ये कबड्डी , खो-खो  ,डॉजबॉल, रीले तसेच वैयक्तिक खेळामध्ये धावणे, गोळा फेक ,थाळीफेक इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. या क्रीडा स्पर्धेमध्ये  छात्राध्यापकांनी गुणलेखन, किपर  टायमर लावणे पंच खेळाडू पट्टीवरील बाहेरील व्यवस्थापन, सूत्रसंचालन ,विजेत्या संघाची नोंद सूत्रसंचालक कडे पोहोचवणे इत्यादी भूमिका बजावल्या.

**विद्यार्थी शिक्षक दिवस :-**

दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी  के. वी. कन्या विद्यालय ,पनवेल येथे विद्यार्थी शिक्षक दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनीना शाळेचे कामकाज  वाटून दिले होते .विद्यार्थ्यांनीमध्ये मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक , विषय शिक्षक तसेच शिपाई अशा प्रकारे  सर्वांना कामाची  विभागणी करून देण्यात आली होती . त्या दिवशी पूर्ण शाळा त्या विद्यार्थ्यांनीनीचं  सांभाळली तसेच संध्याकाळीही ४ वाजता  कार्यक्रमांचे आयोजन केले होते त्यात शाळेची माजी विद्यार्थिनी मिथिला माळी  या प्रमुख पाहुण्या होत्या . विद्यार्थिनी मुख्याध्यापिका व इतर विद्यार्थी विषय शिक्षक यांची भाषणे तसेच प्रमुख पाहुण्यांचे भाषण झाले  व कार्यक्रम  संपन्न झाला.

**समाजसेवा:-**

दिनांक 22/ 12/ 2023 या दिवशी समाजसेवा उपक्रम राबविला होता. त्यामध्ये सर्व छात्राध्यापकांनी विद्यार्थ्यांकडून साफसफाई करून घेतली.

**सांस्कृतिक कार्यक्रम:-**

दिनांक 28/ 12/ 2023 रोजी शाळेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यावेळी सर्व छात्र अध्यापकांना विद्यार्थ्यांची डान्स प्रॅक्टिस घेण्याची सूचना शाळेतील शिक्षकांनी दिली होती. छात्रअध्यापकांनी वेगवेगळ्या वर्गावर जाऊन विद्यार्थ्यांचे डान्स प्रॅक्टिस घेतली. 28/12/ 2023 रोजी बक्षीस वितरण समारंभ पार पडला यामध्ये सर्व शिक्षकांना अल्पोहार वाटप केले. 29/12/2023 ला शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अल्पोहार वाटप केला.

Edit with WPS Office

**विज्ञान प्रदर्शन:-**

दिनांक 27 डिसेंबर २०२४ ते २८ डिसेंबर २०२३ या दिवशी विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे मॉडेल तयार केले होते, ते मॉडेल लावणे साठी विद्यार्थ्यांना मदत केली. त्यातून तीन क्रमांक काढण्यात आले.

**पर्यवेक्षण:-**

दिनांक 2/11/2023 ते 7/11/2023 या कालावधीत इयत्ता 6 वी ते 10वी विद्यार्थिनींची परीक्षा घेण्यात आली, त्यात सर्व छात्र अध्यापकांनी परीक्षा विभागाला वर्गावर जाऊन पर्यवेक्षक म्हणून मदत केली.

**सावित्रीबाई फुले कार्यक्रम:-**

दिनांक 3 जानेवारी या दिवशी सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली, तर विद्यार्थिनींची भाषणे व गीत गायन झाले व त्यानंतर विद्यार्थिनींना सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाविषयी व कार्याविषयी शिक्षकांनी माहिती सांगितली आणि कार्यक्रम समाप्त झाला.

**रिक्त तासिका:-**

संपूर्ण आंतरवासितेच्या कालावधीमध्ये सर्व छात्रअध्यापकांनी मिळून एकूण 210 एवढ्या रिक्त तासिका घेतल्या.

**विशेषांअंक**

आशयाधिष्ठित मध्ये उपविषय घेऊन निवडलेल्या उपविषयावर लेख तयार केला. त्या सर्व लेखांची तपासणी मार्गदर्शक प्राध्यापकांनी केली. सर्व चुका दुरुस्त करुन झाल्यावर, दिलेल्या उपविषयांवर विशेषांअंक तयार केला.

**आंतरवासिता समारोप समारंभ :-**

दिनांक २०जानेवारी २०२४ रोजी अंतरवासिकेचा शेवटचा दिवस होता . के. वी कन्या विद्यालयातील सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या उपस्थितीत अंतरवासिता समारोप समारंभाचा कार्यक्रम पार पाडला शिक्षकांचे आभार मानले व शाळेचा निरोप घेतला.

अशाप्रकारे मार्गदर्शक प्राध्यापक डॉ. बी. जी. खाडे सर यांच्या मार्गदर्शनानुसार को. ए. सो. के. वी. कन्या विद्यालय, पनवेल येथील मुख्याध्यापक व शिक्षकांच्या सहकार्याने गट क्रमांक दोन ही ११ आठवड्यांची आंतरवासिता यशस्वीरित्या पूर्ण झाली.

## आंतरवासितेचे नियोजन करताना ची छायाचित्रे






Edit with WPS Office


## घटक चाचणी विभाग आणि पेपर मांडणी









## घटक चाचणी पर्यवेक्षण नियोजन




## घटक चाचणी







Edit with WPS Office

## घटक चाचणी विभागाकडून विषय शिक्षकांना पेपर वाटप करतानाची छायाचित्रे













## Co- Teaching













Edit with WPS Office

# आशयाधिष्ठित पाठ घेतनाची क्षणस्थिती








# शाळेच्या मुख्याध्यापक निरोप समारंभ






Edit with WPS Office

## दहा सराव पाठ घेतानाची छायाचित्रे


















Edit with WPS Office

# विज्ञान प्रदर्शन
















Edit with WPS Office

## क्रीडा स्पर्धा घेताना शिक्षक प्रशिक्षणार्थी पंच आणि सूत्रसंचालन करतांना छायाचित्रे















Edit with WPS Office

## नवीन मुख्याध्यापकांचे स्वागत करताना ची छायाचित्रे




## शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांनी विद्यार्थ्यांचे शालेय विषया बाहेरील घेतलेल्या विविध कृती









Edit with WPS Office

## शाळेच्या घटक चाचणीत शिक्षक प्रशिक्षणार्थी पर्यवेक्षण करतानाची छायाचित्रे









## पाठ झाल्यावर शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करताना ची छायाचित्रे







Edit with WPS Office

## चित्रकला स्पर्धा घेतानाची छायाचित्रे




## निरोप (समारोप) समारंभ घेतानाची छायाचित्रे.













Edit with WPS Office

Edit with WPS Office